महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

सावित्रीबाई फुले विद्यापीठ रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

दुरध्वनी क्र. ०२०-२५६७६८१८, २५५५९२०० Email: principal.gppune@dtemaharashtra.gov.in

---

जा.क्र.शातंपु/विवि/जातपडताळणी/२०२१-२२/५३८३ दि. 24 DEC 2021

**सूचना**

**विषय** :– जात पडताळणी करण्याबाबत..........

वरील विषयांन्वये शैक्षणिक वर्ष सन 2021 – 22 मध्ये प्रवेश घेतलेल्या राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, पुढील उच्च शिक्षणाकरीता व शिष्यवृत्तीसाठी राखीव प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी जात पडताळणी करुन घेणे आवश्यक आहे. संस्थेकडून शिफारस पत्र व नमूना 15 A प्राप्त करुन घेण्यासाठी राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी खालील प्रमाणे कागदपत्राच्या सांक्षाकित प्रती विद्यार्थी विभागात जमा कराव्यात. अर्ज जमा केल्यानंतर 8 दिवसांनी संस्थेकडून शिफारस पत्र व नमूना 15 A मिळेल. अर्ज करण्याचा कालावधी 27/12/2021 ते 15/01/2022 असेल त्यानंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. **सन 2021 – 22 मध्ये तृतीय वर्षात शिकत असलेले व SC & ST प्रर्वगातील सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी व पुढील शैक्षणिक प्रवेशासाठी जात पडताळणी करणे आवश्यक आहे.**

**आवश्यक कागदपत्रे**

1. चालू सत्रातील बोनाफाईड प्रमाणपत्र. (बोनाफाईड प्रमाणपत्र विभाग प्रमुख यांच्याकडून मिळेल.)
2. विद्यार्थ्यांचा पूर्वीचा शाळासोडल्याचा दाखला.
3. विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला.
4. चालू सत्रातील फी पावती व प्रवेश पत्र. (cap certificate)
5. विहीत नमुन्यातील अर्ज. (अर्ज विद्यार्थी विभागात मिळेल.)

तसेच विद्यार्थ्यांना संस्थेकडून शिफारस पत्र व नमूना 15 A मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी जात पडताळणीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज परिपूर्ण भरणे आवश्यक आहे. भरलेला अर्ज व इतर कागदपत्रे प्रत्यक्ष संबंधित जात पडताळणी कार्यालयात जमा करणे आवश्यक आहे.

**जात पडताळणीचा अर्ज करण्याचे संकेतस्थळ**

1. https://bartievalidity.maharashtra.gov.in ( ST प्रवर्ग सोडून सर्व राखीव प्रवर्गासाठी )
2. https://etribevalidity.mahaonline.gov.in/ (फक्त ST प्रवर्गाठी )

(सही) २४/१२/२१

प्रबंधक

शासकीय तंत्रनिकेतन,पुणे

**प्रत** – 1.सर्व विभागप्रमुख, यांना कळविण्यात येते की, सदर सूचना आपल्या विभागातील सर्व विद्यार्थ्यांना निदर्शनास आणून द्यावी.

2. मुख्य सूचना फलक.
3. विभाग प्रमुख संगणक त्यांना विनंती करण्यात येते की, 15 जानेवारी 2022 पर्यंत संस्थेच्या संकेतस्थळावर कृपया प्रसिध्द करण्यात यावी.